दिनांक १२ ते १६ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत भोपाळ, मध्यप्रदेश येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा बास्केटबॉल स्पर्धा (२०१७-१८) मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१७ /प्र.क्र.१४०/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- ०९ नोव्हेंबर, २०१७

वाचा :- (१) केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ क्रमांक- ५९/०२/२०१७ -१८ /सीसीएससीएसबी यांचे दिनांक १६.१०.२०१७ चे पत्र.
(२) सचिवालय जिमखान्याचे पत्र क्र.-अभानासे/ बास्केटबॉल /२०१७-१८, दि.२७.१०.२०१७
(३) उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री / अभानासे/१७-१८/का-४/१९६५, दि.०७.११.२०१७.

: शासन निर्णय:

दिनांक १२ ते १६ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत टि.टि. नगर स्टेडियम, भोपाळ, मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा **बास्केटबॉल** स्पर्धा २०१७-१८ मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता बृहन्मुंबई महानगर पालिका, सबिना चंद्रशेखर मनोरंजन मैदान, मुंबई येथे दिनांक दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेल्या राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्य संघाच्या सदर स्पर्धेतील सहभागासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे **रु.६४,७५०/-(रुपये चौसष्ट हजार सातशे पन्नास फक्त)** इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किट बॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील. या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक / व्यवस्थापक यांना दिनांक ७.११.२०१७ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे या खेळाडूंना दिनांक ८.११.२०१७ ते १०.११.२०१७ या कालावधीतील प्रशिक्षण शिबिरासाठी सचिवालय जिमखान्यात उपलब्ध करून देण्यात याव्यात. तसेच त्यानंतर खेळाडूंनी दिनांक १२.११.२०१७ ते १६.११.२०१७ या कालावधीतील स्पर्धेत उपस्थित राहावे. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. संघातील खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची प्रशिक्षण शिबीर व स्पर्धा काळातील कार्यालयीन अनुपस्थिती ही शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/ अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसानंतर खेळाडूंनी मुख्यालयास परत यावे. या सर्वाचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या / कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी / कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबई बाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास / दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी.

या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनाला सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी "२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षित लेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र "ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०९१७३३२६८१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.11.09 17:22:16 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, पुणे

३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई,
४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय, मुंबई.
९. मानद महासचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)
१०. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)
११. निवड नस्ती (क्रीयुसे-२).

विवरणपत्र "अ"

दिनांक १२ ते १६ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत भोपाळ, मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा बास्केटबॉल स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या बास्केटबॉल संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	ट्रॅकसूट	किटबॅग	विभाग/ कार्यालय
१	जुबेर पीरअहमद शेख, मार्गदर्शक	नाही	नाही	जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जिल्हा - कोल्हापूर.
२	भालचंद्र भा. झोपे, तंत्र अधिकारी	नाही	नाही	विभागीय कृषि सहसंचालक, अश्विन बॅरॅक, विभागीय आयुक्त कार्यालयाजवळ, नाशिक रोड, नाशिक.
३	संदीप औ. कोरेकर, लिपिक- टंकलेखक	नाही	नाही	कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
४	अतुल शि. घोडके, लिपिक टंकलेखक	नाही	नाही	संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
५	रत्नाकर खिलारे, लिपिक टंकलेखक	नाही	नाही	राजशिष्टाचार, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
६	उदय पवार, क्रीडा अधिकारी	होय	होय	क्रीडा व युवक सेवा, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी,जिल्हा- पुणे.
७	अभय चव्हाण, क्रीडा अधिकारी	नाही	नाही	जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सांगली, जिल्हा- सांगली.
८	राजेश क्षत्रिय, क्रीडा अधिकारी	होय	होय	जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक जिल्हा- नाशिक.
९	पराग दिक्षीत, लिपिक	नाही	नाही	तालुका कृषि अधिकारी, दिंडोरी, जनता विद्यालयाजवळ, जिल्हा- नाशिक
१०	राजेंद्र मो. होळकर, उपसचिव	नाही	नाही	मा. मंत्री (जलसंपदा), मंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
११	सुनिल शिंदे, समादेशक	होय	होय	राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.५, दौंड, करकुंभ रोड, दौंड, जिल्हा- पुणे.
१२	तुषार शिंदे, अधिक्षक	नाही	नाही	आरोग्य संचालनालय, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई- १.
१३	रविंद्र रा. मंजुळे, प्रशिक्षक	नाही	नाही	कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१४	प्रदिप नंदलाल माहूल, व्यवस्थापक	नाही	नाही	सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते. रुग्णालय, मुंबई- ४०० ००१.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.11.09 17:22:30 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र " ब "

दिनांक १२ ते १६ नोव्हेंबर २०१७ या कालावधीत भोपाळ, मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा बास्केटबॉल स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या बास्केटबॉल संघासाठी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र.

क्र.	तपशील	रुपये
अ)	**निवड चाचणी**	
१	निवड चाचणी पूर्वीचा खर्च (टपाल खर्च, छपाई खर्च)	५००/-
ब)	**निवड चाचणी आयोजनाचा खर्च.**	
१	प्रमुख पंच व मदतनीस यांचे मानधन व प्रवास खर्च.	१,५००/-
२	निवड चाचणीस उपस्थित जिमखाना पदाधिकारी /प्रतिनिधी व पंच/ मदतनीस यांच्याकरिता चहा/ अल्पोपहारावरील खर्च.	२,०००/-
३	२ बास्केट बॉल	१,४००/-
४	प्रथोमपचार साहित्य / प्रवास खर्च.	५००/-
क)	**प्रशिक्षण शिबीर**	
१	३ दिवसाचा प्रशिक्षण शिबीराकरिता खेळाडू, व्यवस्थापक/ प्रशिक्षक यांच्या चहा व अल्पोपहारावरील खर्च. (१००x१४x३)	४,२००/-
२	प्रशिक्षकाचे मानधन (तीन दिवसाकरिता)	२,०००/-
३	२ बास्केट बॉल (सरावासाठी)	१,४००/-
४	औषधे (रेली स्प्रे) व किरकोळ खर्च.	५००/-
ड)	**वैयक्तीक क्रीडा साहित्य खरेदीसाठी होणारा खर्च :-**	
१)	३ ट्रॅकसूट रु. ७००/- प्रमाणे.	२,१००/-
२)	३ किटबॅगस् प्रत्येकी रु. ५००/- प्रमाणे.	१,५००/-
३)	२६ टि शर्टस् रु. ५००/- प्रमाणे.	१३,०००/-
४)	२६ शॉर्टस् रु. ५००/- प्रमाणे.	१३,०००/-
५)	१४ जोडी पायमोजे प्रत्येकी रु. ७५/- प्रमाणे.	१,०५०/-
६)	१४ बूटांचे जोड प्रत्येकी रु.८००/- प्रमाणे.	११,२००/-
७)	१४ टॉवेल्स प्रत्येकी रु. १००/- प्रमाणे.	१,४००/-
८)	१३ निकॅप रु. १५०/- प्रमाणे.	१,९५०/-
९)	१३ रिस्टबॅण्ड रु.१५०/- प्रमाणे.	१,९५०/-
१०)	१३ सपोर्टर रु. २००/- प्रमाणे.	२,६००/-
फ)	**प्रथमोपचाराकरिता खर्च.**	
१)	ग्लुकोज / औषधे/ स्प्रे इत्यादीसाठी खर्च व किरकोळ खर्च.	१,०००/-
	एकूण :- (रु. चौसष्ट हजार सातशे पन्नास फक्त)	**६४,७५०/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.11.09 17:22:42 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र "क"

दिनांक १२ ते १६ नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत भोपाळ, मध्यप्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा बास्केटबॉल स्पर्धा २०१७-१८ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या संघाची निवड करण्यासाठी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१७ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले कर्मचारी खेळाडूंची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव	विभाग/ कार्यालय
१	जुबेर पीरअहमद शेख, मार्गदर्शक	जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर, जिल्हा- कोल्हापूर
२	भालचंद्र भा. झोपे, तंत्र अधिकारी	विभागीय कृषि सहसंचालक, अश्विन बॅरॅक, विभागीय आयुक्त कार्यालयाजवळ, नाशिक रोड, जिल्हा- नाशिक.
३	संदीप औ. कोरेकर, लिपिक- टंकलेखक	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
४	अतुल शि. घोडके, लिपिक टंकलेखक	संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
५	रत्नाकर खिलारे, लिपिक टंकलेखक	राजशिष्टाचार, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
६	उदय पवार, क्रीडा अधिकारी	क्रीडा व युवक सेवा, शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे, बालेवाडी, जिल्हा- पुणे.
७	अभय चव्हाण, क्रीडा अधिकारी	जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सांगली, जिल्हा- सांगली.
८	राजेश क्षत्रिय, क्रीडा अधिकारी	जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नाशिक, जिल्हा- नाशिक.
९	पराग दिक्षीत, लिपिक	तालुका कृषि अधिकारी, दिंडोरी, जनता विद्यालयाजवळ, जिल्हा- नाशिक
१०	राजेंद्र मो. होळकर, उपसचिव	मा. मंत्री (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
११	सुनिल शिंदे, समादेशक	राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.५, दौंड, करकुंभ रोड, दौंड, जिल्हा- पुणे.
१२	तुषार शिंदे, अधिक्षक	आरोग्य संचालनालय, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार, मुंबई- ४०० ००१.
१३	रविंद्र रा. मंजुळे, लिपिक टंकलेखक	कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१४	प्रदिप नंदलाल माहूल,	सार्वजनिक आरोग्य विभाग, गो.ते. रुग्णालय, मुंबई- ४०० ००१.
१५	प्रकाश चौधरी	मानद सह सचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई- ४०० ०३२
१६	अनिरुध्द देशपांडे, सहाय्यक कक्ष अधिकारी	आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१७	सतीश सोनवाने, सहाय्यक कक्ष अधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१८	अशोक पाडावे, सहाय्यक कक्ष अधिकारी	सहाकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१९	अमित गणपत बराते, सहाय्यक कक्ष अधिकारी	सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०	प्रमोद सावंत, सहाय्यक कक्ष अधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
२१	सुधीर केळसकर, सहाय्यक कक्ष अधिकारी	नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.11.09 17:22:54 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन